कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत कर्दे ता.दापोली जि. रत्नागिरी येथील प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांना निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कोग्राप-२०२५/ई-नस्ती क्र.११९८६१२/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक : १८ सप्टेंबर, २०२५

**वाचा :**

(१) **ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः कोवियो-२०१५/प्र.क्र.७५/यो-६,दि.२३.११.२०१५**
(२) **ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. ग्रासयो-२०१५/ प्र.क्र.७५ /यो-६, दि.२९ जुलै, २०२०**
(३) **ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.कोग्राप-२०२५/E-१०५३९७२/यो-११, दि.०२ एप्रिल, २०२५**

**प्रस्तावना :**

कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमांर्गत कर्दे ता.दापोली जि.रत्नागिरी येथील विविध कामांना संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये रु.१४.०२ कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामांसाठी पहिल्या टप्प्यात प्रशासकीय मान्यतेच्या २० % निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम २५१५ १६७७ ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली रु.२५.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. या तरतुदीतून कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत कर्दे ता.दापोली जि.रत्नागिरी येथील संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांसाठी **पहिल्या टप्प्यात प्रशासकीय मान्यतेची रक्कम रु.१४,०२,००,००० च्या २० % म्हणजे रु.२,८०,००,०००/- (रु. दोन कोटी ऐंशी लक्ष फक्त) इतका निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांना वितरीत करण्यात येत आहे.**

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी सदर निधी वितरीत करताना संदर्भ क्र.१ ते ३ येथील शासन निर्णयांत नमुद अटी व शर्तीचे पालन करावे. ज्या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे त्याच कामांच्या देयकांकरिता खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांची राहील. सदर सहायक अनुदानाच्या विनियोजनासंबंधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालय, मुंबई व या विभागास सादर करावे.

३. सदर खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५ मुख्य लेखाशीर्ष मागणी-२५१५- इतर ग्राम विकास कार्यक्रम-१९६- जिल्हापरिषद/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (०७) कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम

(२५१५ २४३२) -३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) (दत्तमत) या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात यावा.

**४.** प्रस्तुत प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ मधील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे.

**५.** सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने, वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र. ४४०/२०२५ /व्यय-१५, दि.२५.०६.२०२५ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९१८११३७५९९१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=714701FC3DB9C38A46F4CD82E1E450B51A9E92EEDE8C323934F82EDB538D3B20, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C5D0F275C3D9A21DB07FECF7919C2D83796E88930D62D44E7A4A6D4CBEE7E0E, cn=KALU GONYA VALVI
Date: 2025.09.18 13:39:39 +05'30'

(का.गो. वळवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१,मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
९. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, कोकण,
१०.जिल्हाधिकारी , रत्नागिरी,
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी,
१२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद , रत्नागिरी,
१३.जिल्हा कोषागार अधिकारी , रत्नागिरी,
१४.नियोजन विभाग,(का-१४४४) मंत्रालय, मुंबई-३२,
१५.वित्त विभाग (व्यय १५,अर्थसं १६ ,अर्थसं १७) मंत्रालय,मुंबई ३२,
१६.कार्यासन यो-११ संग्रहार्थ.